जगभर

मध्य-पूर्वेतील चिरंतन मूल्ये : पैसा, शस्त्रे आणि श्रद्धा

चन्द्रशेखर पुरन्दरे

आधीच हिंसेने ग्रासलेल्या मध्य-पूर्वेत जूनच्या पूर्वार्धापासून नव्याने अस्वस्थता निर्माण होत आहे. त्याला कारण दोन घटना. एक म्हणजे सौदी अरेबिया, इजिप्तसह काही सुन्नी अरब देशांनी कतार या छोट्या देशाशी संबंध तोडले. कतार एकूण व विशेषत: मध्य-पूर्वेतील सुन्नी आतंकवादाला पाठिंबा देतो असा आरोप. दुसरी इतकीच अनपेक्षित घटना म्हणजे इराणच्या संसदेवर आणि संस्थापक आयातोल्ला खोमेनी यांच्या स्मारकावर आतंकवाद्यांनी एकाच वेळी आत्मघातकी हल्ले केले.

कतार : बहुतेक अंदाजांनुसार दरडोई उत्पन्नात हा देश जगातील सगळ्यात श्रीमंत देश आहे. कतार आज नैसर्गिक वायूचा जगातील मोठा उत्पादक आहे. या जोरावर त्याची अर्थव्यवस्था १९९४ साली ८.१ बिलिअन डॉलर्सपासून २०१४ साली २१० बिलिअन डॉलर्स झाली.

सौदी अरेबिया, इजिप्त, येमेन, बहारीन, युनायटेड अरब एमिरेट्स (यु.ए.ई. - जेथे दुबई आहे) या सभोवतालच्या देशांनी ५ आणि ६ जूनला कतारची बहिष्कृती जाहीर केली. या देशांनी कतारशी व्यापार, लोकांचा प्रवास थांबवला, कतारचा शेजारी देश सौदी. कतारची एकमेव भू-सीमा त्याला लागून आहे, बाकी देश समुद्राने वेढलेला आहे. त्यामुळे खाद्यपदार्थांपासून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा कतारला या मार्गे होतो. ती सीमा बंद झाली. कतारच्या विमानांसाठी या देशांचे आकाशमार्ग बंद झाले, असे अनेक निर्बंध. या देशांमधील कतारी नागरिकांना पंधरा दिवसात कतारला परत जायला सांगितले गेले. यातील अनेक त्या त्या देशांतील नागरिकांशी विवाहित आहेत त्यामुळे कुटुंबांची फारकत सुरू झाली, नोकरी जाणे निराळेच.

सांगायला 'आतंकवादाला कतारचा पाठिंबा' हे कारण आहे.

उदा. एमिरेटसच्या (व बंधने लादणाऱ्या इतर देशांच्या) मते कतार त्या भागातील देशांच्या (बहुतेक सगळ्या हुकूमशाही) वैध, अवैध विरोधकांना, इस्लामी आतंकवाद्यांना, अल् कईदाच्या मारेकऱ्यांना उघड आश्रय देतो, त्यांना सीरिया, लिबियामध्ये आर्थिक मदतही प्रचंड प्रमाणात करतो. किमान पन्नास तरी असे जाहीर फरारी मारेकरी कतारमध्ये राजरोस रहात आहेत. (पाकिस्तानमधील दाऊद इब्राहिमसारखे). सौदीच्या राजाला ठार मारण्याचा कट तेव्हाचा लिबियाचा हुकूमशहा गदाफी व कतारचा हुकूमशहा यांनी २०१० साली केला होता, वगैरे.

हे दर्शनी कारण असले तरी त्यामागे बराच काळ धुमसत असलेली निरनिराळी कारणे आहेत. एकतर कतारची सौदी अरेबियाशी असणारी पारंपारिक दुष्मनी. सौदी अरेबियन राजवट अल सौद या जमातीची आहे तर कतारची राजवट अल थनी या जमातीची. त्यांचे पूर्वापार वैर आहे.तेलाच्या जोरावर व अमेरिकेच्या पाठिंब्यामुळे सौदी अरेबिया ही मध्य-पूर्वेतील निर्णायक सत्ता होऊ इच्छिते. ते कतारला मंजूर नाही. त्याला शह म्हणून कतारने इराणशी (दुसरी इच्छुक सत्ता), इस्राएलशी व्यापारी संबंध प्रस्थापित केले. इराण कट्टर शिया. ज्यू इस्राएल तर मुस्लीम मध्य-पूर्वेचा क्रमांक एकचा शत्रू. म्हणजे जमातींचे वैर, मग धर्मवैर. कतार-इराण यांचे नैसर्गिक वायूचे मोठे संयुक्त प्रकल्प आहेत. त्या अचानक आलेल्या पैशाचा विनियोग करून सौदीचे प्रादेशिक महत्त्व कमी करणे हा प्रयत्न कतार करत आहे, हे तिसरे कारण.

चौथे समकालीन कारण म्हणजे कतार सरकारच्या अनुमतीने व आर्थिक पाठिंब्याने चालू असलेला अल् जझीरा हा टीव्ही चॅनेल. प्रसार-माध्यमे व हुकूमशाही या दृष्टीने हा घटक अभ्यसनीय आहे.

अल् जझीरा : मध्य-पूर्वेतील हा एकमेव चॅनेल स्वायत्त म्हणता येईल. (तो जोपर्यंत कतारी राजवटीवर टीका करत नाही.) अल् जझीराने त्या प्रदेशातील राजवटींअंतर्गत विरोध वेळोवेळी प्रसिद्ध केला आहे. अगदी २००२ ला सौदी अरेबियाने अल् जझीराने केलेल्या टीकेच्या निषेधार्थ आपला राजदूत परत बोलावला होता. अलिकडे, २०११ पासूनच्या अरब वसंतातील सत्ताधीशांच्या विरोधी चळवळींचे अल जझीराने सहानुभूत प्रक्षेपण केले. उदा. इजिप्तमध्ये त्यांनी मोबारक विरोधातील संघर्षात मुस्लीम ब्रदरहूडला पाठिंबा दिला. नंतरची त्यांची राजवटही सकारात्मक दाखवली. मुस्लीम ब्रदरहूडला पदच्युत करून आलेल्या सध्याच्या लष्करी राजवटीला असे दर्शन खुपत आलेले आहे. तीच गोष्ट थोड्या फार फरकाने बहारीन, यु.ए.ई.ची.

भर म्हणून मे महिन्यामध्ये अल जझीराने एक बातमी दिली - एमिरेटसच्या अमेरिकेतील राजदूताची अंतर्गत ईमेल प्रसृत करण्यात आली. त्यानुसार एमिरेटस आणि इस्राएल यांचे अनधिकृत संबंध आहेत हे दिसले. इस्राएल-वैरावर पोसलेल्या अरब मध्य-पूर्वेला हा मोठाच धक्का होता. कोणीतरी राजदूताचे ई-मेल हॅक करून हा अप-प्रचार केला असा एमिरेट्सचा दावा. बोट कतारकडे. त्यानंतर कतारच्याच अमिराची स्वत:ची ईमेल

हॅक झाली, त्यातील वक्तव्ये ही शेवटची काडी ठरली. त्यानुसार इराण, इराणचे बाहुले हेझ्बोल्ला आणि इस्राएल यांच्याशी संबंध ठेवण्यात काही गैर नाही. त्यांच्याशी वाटाघाटी गर्ह्य नसाव्यात. कतारच्या मते हे (ही) हॅकर्सचे उद्योग, तेव्हा अशा ईमेल्स्मध्ये तथ्य नाही. इतरांच्या मते हा कतार आणि बाकी अरब राष्ट्र यातील चालू असणाऱ्या वैराचा भाग आहे आणि खासगी भाडोत्री हॅकर्सतर्फे हा कार्यक्रम केला गेला. मध्यंतरी यांत रशियाचेही नाव आले आणि परस्पर-संशय वाढले.

बहिष्कृती जाहीर होताच तुर्कस्तानने हवाई मार्गे अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा कतारला सुरू केला. इराणने समुद्रमार्गे. त्यामुळे जनतेला आता तरी कसलाच तुटवडा नाही किंवा वैद्यकीय सेवांवरही दुष्परिणाम झालेला नाही.

विशेष म्हणंजे सौदी अरेबियाची राजधानी रियाध येथे अमेरिकन अध्यक्ष ट्रम्पच्या उपस्थितीत २०-२१ मे दरम्यान अरब राष्ट्रांची संमेलने झाली. अमेरिका-सौदी ही द्विपक्षीय चर्चा, मग सहा आखाती देशांची संघटना व नंतर ५५ इस्लामी देशांचे शिखर संमेलन या दौऱ्यात ट्रम्पने संबोधित केले आणि काही नेत्यांशी वैयक्तिक चर्चा केल्या (त्यात कतारचा अमीरही). आखाती देशांच्या संघटनेतील देश - सौदी अरेबिया, यु.ए.ई., बहारीन, ओमान, कुवेत आणि कतार. पुढच्या पंधरा दिवसात कतारला बहिष्कृत करण्यात आले. या दौऱ्यात सगळ्या इस्लामी राष्ट्रांनी आतंकवादी शक्तींच्या विरुद्ध आघाडी उभारण्याची जरूरी ट्रम्पने अधोरेखित केली. ज्या सौदीमध्ये इस्लामिक स्टेटचा, अल् कईदाचा जन्म झाला, जेथे राजवट कमालीची असहिष्णु व कर्मठ आहे, ज्या सौदीने आणि इजिप्तने ट्विन टॉवर्सचे हत्यारे पाठवले, ज्या इजिप्तमध्ये अहिंसक विरोधकांना राजरोस गोळ्या घातल्या जातात, तुरुंगात डांबले जाते, त्याच सौदीच्या राजधानीत, इजिप्तच्या अध्यक्षाच्या समोर अमेरिकन अध्यक्षाने हे विधान करणे म्हणजे अंतस्थ हेतू निराळा असणार, ते पुढे स्पष्ट व्हावे.

या आघाडीला अमेरिकेचा पूर्ण पाठिंबा असेल असेही ट्रम्पने खास (अपरिपक्व) अतिशयोक्त शैलीत जाहीर केले. हा रोख इस्लामिक स्टेट, पॅलेस्टाईनमधील हमास गट यांच्याबरोबरच इराणवर होता. इराणशी ओबामा राजवटीने केलेला अणु-शक्ती करार हा 'अमेरिकेच्या इतिहासातील सगळ्यात घातकी करार आहे' असे ट्रम्पचे आधीपासूनचे मत आहे. त्या करारावर सौदीही नाराज होता. इराण या कराराने स्वस्तात सुटला आणि भविष्यात अण्वस्त्रधारी धोका होईल ही भीती. परत शिया-सुन्नी हाडवैर. त्या संदर्भात वर म्हटलेली कतार-इराण जवळीक सौदीला धोकादायक वाटते. ओबामाचे धोरण सौदीला दोन हात दूर ठेवण्याचे होते. ट्रम्पचे बरोबर उलट्या दिशेला जाते. (याच बाबत नव्हे, तर अमेरिकन अंतर्गत आरोग्य धोरण, अमेरिका - क्यूबा संबंध इ.) म्हणजे, सौदीची भूमिका ट्रम्पने या परिषदेत मान्य केली असा अर्थ सौदीने या भेटीवरून काढला आणि आपल्या प्रभाव क्षेत्रातील बहारीन व यु.ए.ई.च्या साथीने कतारवर कारवाई केली. तिलाही ट्रम्पने पाठिंबा दिला. विनोद म्हणजे, ही कारवाई आपल्या पुढाकारामुळेच झाली, ते आपल्या परराष्ट्रीय धोरणाचे यश आहे - असाही दावा केला! आता या आघाडीत पाकिस्तान व आफ्रिकेतील इतर राष्ट्रे कतारच्या विरुद्ध उभी करण्याचा सौदीचा प्रयत्न आहे. ही राष्ट्रे सौदीच्या प्रचंड मदतीवर चालू आहेत. उदा. पाकिस्तानला आर्थिक मदत, अरब वसंतादरम्यान बहारीनच्या राजवटीला उठाव दडपण्यासाठी स्वत:चे लष्कर पाठवणे, वगैरे. वस्तुत: कतारने वेळोवेळी दिलेल्या आश्रयांमुळे मुस्लीम ब्रदरहूड, पॅलेस्टाईनमधील हमास, रशियातील फुटीरतावादी चेचेन आणि अफगाणिस्तानमधील तलेबान - या एरवी भूमिगत असणाऱ्या संघटनांशी संवाद तरी शक्य झाला. त्या संघटनांना 'पत्ता' मिळाला. नाहीतर वाटाघाटी कोणाशी आणि कोठे करायच्या हेच तोपर्यंत संदिग्ध होते.

या भेटीत ट्रम्पने सौदीशी ११० बिलियन डॉलर्सचा शस्त्र-पुरवठा करारही केला. हाही इराणविरुद्ध सौदीचे बळ वाढवण्याचा प्रयत्न आहे. एक लक्षणीय बाब म्हणजे कतारमध्ये अमेरिकेचा लष्करी तळ आहे. तेथे सुमारे ११,००० अमेरिकन सैनिक तैनात असतात. हा तळ आपल्याकडे यावा अशी यु.ए.ई.ची मागणी आहे. ट्रम्पच्या वस्तुस्थितीच्या अज्ञानाचा व अल्प-दृष्टीचा पूर्वी उल्लेख केला आहे. शस्त्रास्त्रे पुरवण्याचे कंत्राट अमेरिकेला मिळवणे ही ती अल्प-दृष्टी. ती शस्त्रात्रे कोण कोणाविरुद्ध कशासाठी वापरणार याचा विचार दिसत नाही.

आधीच येमेनमध्ये इराण-सौदी परस्परांच्या विरोधात आहेत. यांच्यातील शीत-युद्ध हे सीरियाच्या/इराकच्या अस्थैर्याचे एक कारण आहे. अशा परिस्थितीत महासत्तेने दूर-दृष्टीने, टिकाऊ शांतता प्रस्थापित करण्याचे धोरण आखणे अपेक्षित असते. त्याऐवजी, प्रादेशिक युद्धखोरी वाढवणे हा धंदा मिळवण्याच्या मोहाचा परिणाम दिसतो. धोरण एकच - येन केन प्रकारेण पैसा मिळवणे. नैतिकता, सामाजिक परिणाम हे ट्रम्पच्या वैयक्तिक व्यवसायी आयुष्यातही नगण्य होते, आताही आहेत.

बंदी घातलेल्या देशांनी कतारकडे २३ जूनला १३ मागण्या केल्या, त्यानुसार धोरण बदलले तर ही बंदी उठेल. या अन्वये अल्-जझीरा बंद करावा, मुस्लिम ब्रदरहूड, इराणशी संबंध तोडावेत, वगैरे. हे कतारने दहा दिवसांत करायचे आहे. कतारने सगळ्याच मागण्या फेटाळल्या आहेत. हा आपल्या सार्वभौमत्वावर हल्ला आहे, असे कतारचे म्हणणे.

हे चहाच्या कपातील वादळ ठरते का चिघळणारा नवीन संघर्ष होतो, हे लवकरच दिसेल.

इराण : 'मध्य-पूर्वेतील आतंकी वातावरणातून सुरक्षित राहिलेला एकमेव देश' अशा वल्गना इराणची राजवट परवा-परवापर्यंत करत असे. त्या दाव्याला ७ जूनला तडा गेला. त्या दिवशी सकाळी साडेदहा वाजता इराणच्या संसदेवर आणि शहानंतरच्या (१९७९) शिया धार्मिक इराणचे संस्थापक आयातोल्ला खोमेनी यांच्या स्मारकावर आत्मघातकी हल्ले झाले. त्यात किमान सतरा लोक बळी पडले - त्यात एका महिलेसकट सहा आतंकवादी आणि ४० लोक जखमी झाले. हा हल्ला आम्ही केला असे इस्लामिक स्टेटने जाहीर केले. इस्लामिक स्टेट ही सौदी अरेबिया आणि अमेरिकेची निर्मिती आहे असा विश्वास असणारी इराणमधील मोठी लोकसंख्या आहे. त्यांच्या ग्रहाला ही 'जबाबदारी' पोषक ठरली. अधिकृत गर्भित इशाराही सौदीकडे होता. इराण जरी बहुसंख्य पर्शियनवंशीय शिया मुस्लीम असला तरी तेथे सुमारे ९ टक्के - ७०-७२ लाख - सुन्नी मुस्लीम आहेत. ते बहुश: कुर्द किंवा बलुच आहेत. इराणमध्ये सुमारे ८ हजार ज्यूही आहेत. यांना इराण सरकार सुरक्षित राखते हा स्टेटच्या मते अपराध आहे. इस्लामिक स्टेटच्या 'आदर्श'वादानुसार माणूस जर सुन्नी मुस्लीम असेल तरच त्याला जिवंत राहण्याचा हक्क आहे. नाहीतर अशा अश्रद्धांना ठार मारणे हे स्टेटच्या सैनिकांचे धर्मकर्तव्य आहे. म्हणजे, या अश्रद्धात शिया आले, ज्यू तर आलेच आले. याचा परिणाम आता इराणमध्ये सगळ्या सुन्नी अल्पसंख्यांकांकडे बहुसंख्य संशयाने पहाण्यात होणार.

यात थोडे तत्त्वज्ञानही गुंतलेले आहे. मुस्लीम राज्य कसे चालवावे याबाबतच्या आयातोल्ला खोमेनींच्या विचारानुसार जर एखादा प्रेषित हजर नसेल (आणि एकविसाव्या, किंवा, त्यांच्या विसाव्या शतकातही) असा प्रेषित कोठून येणार? तर अशा परिस्थितीत एखाद्या धर्मगुरूने राज्य चालवावे. म्हणून त्या आयातोल्लानंतर सध्याचा आयातोल्ला. (संसद असली, अध्यक्ष असला तरी खरी सत्ता सर्वोच्च आयातोल्लाकडे). या अन्वयाला 'वेलायत-ए- फकी' म्हणतात. इराण तसा चालतो. ही शिया श्रद्धा आहे म्हणून सुन्नी मुस्लिमांना, विशेषत: स्टेटला नामंजूर आहे. प्रेषित एकच - मुहम्मद. खिलाफत आणायची ती त्याच्या नावाने. भले 'आपले' कितीही मरोत, 'त्यांचे' ठार मारायचे. इराणमधील आतंकवादी हल्ला या श्रद्धेच्या दृष्टीनेही पहायला हवा.

वरील विवेचनावरून लोकशाही (तिची मागणी अरब वसंतात दाबली गेली) ही मध्य-पूर्वेच्या संदर्भात आज किती अप्रस्तुत संकल्पना आहे हे स्पष्ट व्हावे. शिया-सुन्नी विद्वेष हा अधिक महत्त्वाचा घटक आहे. (हे निरीक्षण मी सीरियन अरब वसंतात केले होते. ते आज मोठ्या प्रमाणावर लागू दिसते.) इराक़, सीरिया, येमेनसारख्या अराजकात किंवा उर्वरित मध्य-पूर्वेतील हुकूमशाहीत हा विद्वेष वाढत आहे. लोकांना त्या चष्म्यातून सद्यस्थिती पहायला भाग पाडले जात आहे. त्याला राजवटी व इस्लामिक स्टेट दोन्ही जबाबदार आहेत. (वस्तुत: दोन्हींच्या आदर्शवादात मूलभूत फरक नाही, पण तो वेगळा विषय.)

Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com